# सातारा जिल्हा परिषद,सातारा
## ग्रामपंचायतविभाग
**जिल्हा परिषद मुख्य इमारत,चौथा मजला,सातारा-कोरेगांव रोड,सदरबझार,कॅम्प,सातारा-४१५००१**
**दुरध्वनी क्रमांक-02162 295043, ई मेल-vptzpsatara2@yahoo.in**


जा.क्र.ग्रा.पं.6(1)-सीआर-वशि/4339-2 /2024,ग्रामपंचायत विभाग,दिनांक-30/5/2024

प्रति,
श्री.कौस्तुभ राणे
कक्ष अधिकारी,ग्राम विकास विभाग,महाराष्ट्र शासन
२५ मर्झबान पथ,बांधकाम भवन,मुंबई

विषयः Local Government Directory या पोर्टलचे eGramswaraj या पोर्टलशी इंटीग्रेशन करुन ग्रामपंचायतींचे मॅपिंगबाबत..

संदर्भः १.राज्य प्रकल्प संचालक,राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र जा.क्र.राग्रास्वअ/एलजीडी कोड/८९२/२०२३-२४, दि.१८/७/२०२३
२.उपसचिव,ग्राम विकास विभाग यांचेकडील पत्र क्रमांकःएलजीडी-३७२३/प्र.क्र. ५५/आसक,दिनांक २५/७/२०२३
३.मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमी अभिलेख (महाराष्ट्र राज्य) यांचे कार्यालयाकडील पत्र क्र.रा.भु.४/महसूली गावे/कार्यपध्दती/२०२२ दिनांक ३/११/२०२२
४.मा.जिल्हाधिकारी,सातारा यांचेकडील पत्र क्र.७/१२ संगणकीकरण/कावि/११६/२३ दिनांक ४/१०/२०२३

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की,मा.जमाबंदी आयुक्त कार्यालयाने महसूली गावांचे LGD Code तपासणीची व्यापक मोहिम हाती घेतली होती. यामध्ये ज्या महसूली गावांची महाराष्ट्र लॅंड रेव्हेन्यू कोड १९६६ चे कलम ४(१) ची अधिसूचना अथवा मा.जिल्हाधिकारी यांचे महसूली गाव असलेबाबतचे प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही, अशी गावे Local Government Directory (LGD) मधून वगळण्यात आली. Local Government Directory या पोर्टलचे EGramswaraj या पोर्टलशी इंटीग्रेशन करण्यात आलेले असल्याने महसूली गांवे वगळलेल्या ग्रामपंचायती EGramswaraj या पोर्टलवर दिसत नसल्याने या ग्रामपंचायतींचे EGramswaraj संदर्भातील सर्व कामकाज बंद आहे. त्यामुळे या ग्रामपंचायतींचे विकास आराखडे अपलोड होत नाहीत.

महसूली गावांच्या महाराष्ट्र लॅंड रेव्हेन्यू कोड १९६६ चे कलम ४(१) ची अधिसूचना मा.जमाबंदी आयुक्त कार्यालयास प्राप्त न झालेने सातारा जिल्हा परिषदेकडील एकूण ८ गावे (ग्रामपंचायती) Local Government Directory (LGD) मधून वगळण्यात आली आहेत.यामुळे या ८ ग्रामपंचायती EGramswaraj या पोर्टलवर दिसत नसल्याने या ग्रामपंचायतींचे EGramswaraj संदर्भातील सर्व कामकाज बंद आहे.तसेच या ग्रामपंचायतींचे विकास आराखडे अपलोड होत नाहीत.

सातारा जिल्हा परिषदेकडील Local Government Directory (LGD) मधून वगळण्यात आलेल्या गावांपैकी ८ महसूली गावांच्या महाराष्ट्र लॅंड रेव्हेन्यू कोड १९६६ चे कलम ४(१) ची अधिसूचना प्राप्त करुन घेवून या गावांचे LGD Code रिजनरेट करुन या गावांचा पुनश्चः Local Government Directory (LGD) मध्ये समावेश करण्यासाठीचा प्रस्ताव वरील संदर्भिय क्र.४ नुसार मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमी अभिलेख, (महाराष्ट्र राज्य),पुणे यांचे कार्यालयास सादर करण्यात आला होता.

सदरच्या प्रस्तावानुसार मा.जमाबंदी आयुक्त आणि संचालक,भूमी अभिलेख,(महाराष्ट्र राज्य),पुणे यांचे कार्यालयाने LGD Code रिजनरेट व ॲक्टीव्ह केलेल्या ८ ग्रामपंचायतींची यादी सोबत आपले कार्यालयाकडे पाठविण्यात येत असून या यादीतील नमुद LGD Code नुसार या ग्रामपंचायतींचे Local Government Directory या पोर्टलचे eGramswaraj या पोर्टलशी इंटीग्रेशन करुन ग्रामपंचायतींचे मॅपिंग करणे आवश्यक असल्याने याबाबतची पुढील कार्यवाही त्वरीत आपले कार्यालयाकडून करण्यात यावी ही विनंती.

(अर्चना वाघमळे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
सातारा जिल्हा परिषद सातारा

प्रतः मा.जिल्हाधिकारी सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,सातारा जिल्हा परिषद यांना माहितीसाठी सविनय सादर
संचालक,पंचायत राज,महाराष्ट्र राज्य,पुणे यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सविनय सादर

| अ.नं. | जिल्हा | तालुका | ग्रामपंचायतीचे नांव | VILLAGE CODE | महसूली गावाचे नांव | LGD CODE |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | सातारा | सातारा | जांभळेवाडी (नागठाणे 2) | 946130 | जांभळेवाडी (नागठाणे 2) | 190237 |
| 2 | | | शिवाजीनगर | 563890 | शिवाजीनगर | 244155 |
| 3 | | फलटण | जोर पुनर्वसित (वाखरी) | 945356 | जोर पुनर्वसित( वाखरी ) | ------ |
| 4 | | महाबळेश्वर | पर्वत तर्फ वाघावळे | 563027 | पर्वत तर्फ वाघावळे | 189116 |
| 5 | | वाई | राऊतवाडी | 563164 | राऊतवाडी | 190437 |
| 6 | | पाटण | चव्हाणवाडी (धामणी) | 564281 | चव्हाणवाडी (धामणी) | 189851 |
| 7 | | कोरेगाव | घाडगेवाडी | 946119 | घाडगेवाडी | 237420 |
| 8 | | कराड | पश्चिम उंब्रज(गोडवाडी) | 944131 | पश्चिम उंब्रज(गोडवाडी) | 189210 |

(अर्चना वाघमळे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
सातारा जिल्हा परिषद सातारा